---

बायको : मला आज बरं वाटत नाहीये.

नवरा : अरेच्च्या! पण, मी तर आज तुला शॉपिंगला न्यायचा विचार करत होतो.

बायको : अरे, मी गंमत करत होते !

नवरा : हो का? मी पण गंमतच करतोय. चला उठा आता
आणि जेवणाचं बघा, पोटात कावळे ओरडतायत.

---

जोश्यांच्या घरातून भांडणाचा आवाज ऐकून बंडोपंतांनी घरात डोकावलं.

जोशी दांपत्य भांडत होतं आणि कोचावर दोन माणसं बसली होती.

“काय झालं?” बंडोपंतांनी त्यातल्या एकाला विचारलं.

तो म्हणाला, “आम्हालाही माहीत नाही.

आम्ही जनगणना अधिकारी आहोत.

कुटुंबप्रमुख कोण? नुसतं एव्हढंच विचारलं.”

---

नवरा : ‘सेल्फ कंट्रोल’ तुझ्याकडून शिकायला हवा.

बायको : ते तर आहेच, पण कशावरून तुम्ही हे बोलताय?

नवरा : शरीरात एवढी ‘शुगर’ आहे पण काय मजाल आहे, की जिभेवर येईल !

---